# मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

**(अ) जुन्या वाहनांचे निष्कासन करुन नवीन वाहन खरेदी करतेवेळेस वाहन खरेदीदारास मोटार वाहन करामध्ये अधिक सूट देणे.**

- बीएस-४ व त्यावरील प्रदुषणाची मानके असलेले वाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी करताना मोटार वाहन करामध्ये १६ टक्के व बीएस-३ व त्याखालील प्रदुषणाची मानके असलेले वाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी करताना मोटर वाहन करामध्ये ३० टक्के सूट देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.
- यामुळे कमी इंधनक्षम आणि प्रदुषण करणाऱ्या जुन्या वाहनांची संख्या कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

**(ब) जुन्या परिवहनेतर (खाजगी) वाहनांच्या पर्यावरण करामध्ये वाढ करणे.**

- बीएस-४ व त्याखालील वायू प्रदूषणाची मानके असलेल्या परिवहनेतर (खाजगी) संवर्गातील वाहनांमुळे वायू प्रदूषण जास्त होत असल्याकारणाने अशा वाहनांच्या पर्यावरण करामध्ये दुप्पट वाढ.

**(क) क्रेन आरोहित वाहनांची कराची कमाल मर्यादा रुपये ३० लक्ष करणे.**

- राज्यात क्रेन आरोहित वाहने (Crane Mounted Vehicle) यांना मोटार वाहन कराची कमाल मर्यादा रुपये तीस लक्ष करण्याचे प्रस्तावित आहे.

**(ड) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ५९, ६३, ६० A व ६८ A मध्ये कमी मुद्रांकावर दस्त निष्पादित केल्यास होणाऱ्या दंडात्मक तरतुदींची फेररचना.**

- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार कमी मुद्रांकावर दस्त निष्पादित केल्यास अपराधसिद्धीनंतर सक्त मजुरी व शास्तीची तरतूद आहे. सदर शास्तीच्या रकमेत फेररचना करुन रुपये पाच हजारावरुन एक लाख रुपयांपर्यंत वाढ करणे प्रस्तावित आहे.
- यामुळे कमी मुद्रांकावर दस्त निष्पादन करण्याचे प्रमाण नियंत्रणात येईल.

* * * * *